# महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-१३२४/प्र.क्र.८५/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २२/०३/२०२४.

प्रति,

अपर मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

विषय:- वनजमिन-रायगड
उरण - उसर दरम्यान १२ मी.मी. व्यासाची (१२" dia) लिक्विड प्रोपेन पाईपलाईन सह ऑप्टिकल फायबर केबल टाकण्यासाठी रायगड जिल्ह्यातील ३.९४४३ हे. वनजमिन वळतीकरणाबाबत...

संदर्भ:-केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/एफसीए-एस१/पीआयडी-१५५६१२/ठाणे/२०२३-२४/३२७६, दि. २६.०२.२०२४.

मे. गेल इंडिया लिमिटेड यांना उरण - उसर दरम्यान १२ मी.मी. व्यासाची (१२" dia) लिक्विड प्रोपेन पाईपलाईन सह ऑप्टिकल फायबर केबल टाकण्यासाठी रायगड जिल्ह्यातील ३.९४४३ हे. वनजमीन वळतीकरणाबाबत संदर्भाधीन दिनांक २६.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

२. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील नमूद मुद्यांची माहिती आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास शासनास पाठविण्यात यावी.

(१) प्रस्तुत प्रकरणी पर्यायी वनीकरणाकरीता मौजे अंबिवली, सर्व्हे नं.४५ व मौजे नेरे, सर्व्हे नं.३४६, मधील ८.०० हे. अवनत वनजमिन प्रस्तावित केली आहे. तथापि, वन (संरक्षण व संवर्धन) नियम, २०२३ मधील नियम क्र.१३ (१) मधील तरतुदीनुसार प्रकल्पामध्ये वनेत्तर जमिनीचा समावेश होत असेल, तर पर्यायी वनीकरणासाठी वनेत्तर जमिनीची आवश्यकता असल्याचे नमूद आहे. सबब, सदर प्रकरणी पर्यायी वनीकरणासाठी वनेत्तर जमिन प्रस्तावित करून, १० वर्षाची पर्यायी वनीकरणाची योजना, क्षेत्राचे अधिकार अभिलेख, नकाशे व KML File सादर करावी.

(२) प्रस्तावित क्षेत्रापैकी मोजे खार दुतर्फा बोरली, स.नं./गट नं. २१६, मौजे दळवी खरोशी, स.नं./गट नं. १३, मौजे. बोपोली, स.नं./गट नं. ३७, मोजे. बेळोशी, स.नं./गट नं. ९०,११०,१६८, मोजे कुणे, स.नं./गट नं. ९८ Pt., या क्षेत्राचे अभिलेख सादर करावेत.

(३) तसेच, मोजे धशाखोशी, स.नं./गट नं. १, २,५, ७१, मोजे- खोपटे (कचेरपाडा), स.नं./गट नं.९४, मौजे-दिघाटी, स.नं./गट नं.७८, ३७, मौजे-आढांगी, स.नं./गट नं.३४ आणि मोजे-तळाशेत, स.नं./गट नं.६८ या क्षेत्राच्या अभिलेखावर वन असल्याची नोंद दिसून येत नाही. सबब, सदर जमिन वनजमीन आहे किंवा कसे, याबाबत पुनश्चः खात्री करुन, माहिती सादर करावी.

(४) KML File मध्ये प्रस्तावित प्रोपेन गॅस पाईपलाईन व ऑप्टिकल फायबर केबल लाईनचे ३ पर्याय दर्शविलेले नाहीत. सबब, ३ पर्याय दर्शवून सुधारित KML File सादर करावी.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मुख्य वनसंरक्षक, ठाणे
उप वनसंरक्षक, अलिबाग